पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१,
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय
पत्ता- प्रिमियर कंपनीच्या शेजारी,
जुना पुणे-मुंबई रस्ता, चिंचवड, पुणे १९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट**

दिनांक - २३/०७/२०२२

## मोटार सायकल व मोबाईल फोन चोरणा-या सराईत चोरटयास साथीदारासह अटक
## ६ के.टी.एम. मोटार सायकल व मोबाईल फोन जप्त : महाळुंगे पोलीसांची कामगिरी

---

मौजे-खालुंब्रे, ता-खेड, जि-पुणे गावचे हद्दीतील श्री कानिफनाथ बालाजी ढाकणे हे दिनांक-१५/०७/२०२२ रोजी २३:३० ते दि-१६/०७/२०२२ रोजी ०७:०० वा चे दरम्यान राहते घरी किचनरुम मध्ये मोबाईल फोन चार्जिंगला लावुन झोपले असताना कोणीतरी अज्ञात चोरटयांनी किचन रुममध्ये हात घालुन मोबाईल फोन चोरला. तसेच फिर्यादी कानिफनाथ ढाकणे यांचे बिल्डींग मधील इतर ३ साक्षीदारांचे मोबाईल फोन खिडकीमधुन हात घालुन चोरुन नेल्याचे दिले तक्रारी वरुन चाकण पोलीस स्टेशन अंकित महाळुंगे पोलीस चौकी येथे **गुन्हा रजि.नंबर ११४९/२०२२ भा.द.वि. कलम ४५७, ३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पोलीस आयुक्त **श्री अंकुश शिंदे** यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शन नुसार महाळुंगे पोलीस चौकीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक **श्री.ज्ञानेश्वर साबळे** यांनी आरोपीचे शोधा करीता दोन पथके तयार करुन तपास सुचना दिल्या. तांत्रिक तपास दरम्यान सदरचे चोरटे के.टी.एम.मोटार सायकलवरुन आल्याचे व मोबाईल चोरी करुन पळुन गेल्याचे निष्पन्न झाले. त्यांनी वापरलेल्या के.टी.एम.मोटार सायकलचा नंबर तांत्रिक तपास दरम्यान निष्पन्न करुन के.टी.एम.मालकाकडे तपास केला असता त्यांची व इतर ३ व्यक्तींचे के.टी.एम.मोटार सायकल चोरीस गेले असल्याचे समजले. तांत्रिक तपास दरम्यान मोबाईल फोन चोरणारे चोरटे जालना येथे के.टी.एम.मोटार सायकली व मोबाईल फोन घेवुन पळुन गेले असल्याचे निष्पन्न झाल्याने महाळुंगे चौकीचे तपास पथकाने जालना येथे जावुन स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, जालना यांचे मदतीने सदरचे चोरटे ताब्यात घेतले असुन त्यांना दि-२१/०७/२०२२ रोजी २२:१० वा अटक करुन मा.न्यायालय यांचेकडुन दि-२२/०७/२०२२ ते २६/०७/२०२२ पर्यत पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आली आहे. **तपास दरम्यान आरोपींकडुन ४,९२,५००/रु चा माल जप्त केला असुन ८ गुन्हे उघडकीस आणलेले आहेत.**

**अटक आरोपीचे नाव –**

**१) संदेश प्रभाकर पाटोळे, वय २३ वर्ष,** रा-शिराळा, ता-जाफराबाद जि-जालना
**२) सुरज राजु कसबे, वय २१ वर्ष,** रा-म्हाडा कॉलनी, टी.व्ही.सेंटर जालना

**जप्त माल व उघडकीस आणलेले गुन्हे -**

१) १,२०,०००/ रु ची के.टी.एम. मोटार सायकल (महाळुंगे पोलीस चौकी गुन्हा रजि.नं-९८०/२२)
२) ०,१०,०००/ रु चा मोबाईल फोन (महाळुंगे पोलीस चौकी गुन्हा रजि.नं-११४९/२२ )
३) ०,०२,५००/ रु चे चांदीचे दागिणे (महाळुंगे पोलीस चौकी गुन्हा रजि.नं-११४२/२२)

४) १,००,०००/ रु ची के.टी.एम. मोटार सायकल (चिखली पोलीस चौकी गुन्हा रजि.नं-३६८/२२)
५) ०,८०,०००/ रु ची के.टी.एम. मोटार सायकल (चिखली पोलीस चौकी गुन्हा रजि.नं-३६९/२२)
६) ०,४०,०००/ रु ची के.टी.एम. मोटार सायकल (चिखली पोलीस चौकी गुन्हा रजि.नं-६१/२२)
७) ०,६०,०००/ रु ची के.टी.एम. मोटार सायकल (चिखली पोलीस चौकी गुन्हा रजि.नं-२९२/२२)
८) ०,८०,०००/ रु ची के.टी.एम. मोटार सायकल (चिखली पोलीस चौकी गुन्हा रजि.नं-३२४/२२)

---------------

**४,९२,५००/रु**

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त **श्री.अंकुश शिंदे**, मा.अपर पोलीस आयुक्त **श्री.संजय शिंदे**, मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-१ **श्री मंचक इप्पर**, सहाय्यक पोलीस आयुक्त, चाकण विभाग **श्रीमती प्रेरणा कट्टे**, वरीष्ठ पोलीस निरीक्षक **श्री.ज्ञानेश्वर साबळे** पोलीस निरीक्षक (गुन्हे) **किशोर पाटील** यांचे सुचना व मार्गदर्शनानुसार पोलीस उपनिरीक्षक- **प्रदिप गायकवाड**, अंमलदार-**राजु कोणकेरी, अभिजित भोर, युवराज बिराजदार, विठ्ठल वडेकर, किशोर सांगळे, संतोष काळे, शिवाजी लोखंडे, बाळकृष्ण पाटोळे, संतोष वायकर** यांनी केली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक- **प्रदिप गायकवाड**, व पोलीस अंमलदार **अभिजीत भोर** हे करीत आहेत.

( मंचक इप्पर )
पोलीस उप आयुक्त,परिमंडळ १
पिंपरी चिंचवड शहर